
स्वरूप सावंत
माझे प्रिय विद्यार्थी
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# स्वरूप सावंत

लिखित

विद्यार्थी अनुभव

# माझे प्रिय विद्यार्थी

# माझे प्रिय विद्यार्थी

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

माझे प्रिय विद्यार्थी

स्वरुप अनाजी सावंत

पत्ता A/1203 साईतिर्थ टॉवर, सिद्धार्थ नगर, बारा बंगल्यासमोर, कोपरी ठाणे पूर्व ४००६०३

मोबाइल नंबर 7208045216

ब्लॉग : swarup anaji sawant

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २१ डिसेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

# स्वरुप अनाजी सावंत



शिक्षण क्षेत्रात शिक्षक म्हणून गेली बत्तीस वर्षे कार्यरत. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी नवनवीन उपक्रम करण्याची आवडआहे.

शिक्षकांच्या तंत्रस्नेही राज्यस्तरीय ग्रुपमध्ये सह प्रशासक म्हणून कार्यरत आहे. शिकणे व शिकवणे ही दोन्ही कामे करत आहे. स्टोरी मिरर, उनाड वारा, काव्यांकुर अनेक काव्य गटांमध्ये कविता रचना स्पर्धेत यशस्वी आहे. ब्लॉगवर कविता लेख, कथा, प्रसिद्ध केल्या आहेत.

शिक्षकांच्या विभागीय पातळीवरील स्पर्धांमध्ये भरपूर बक्षिसे मिळविली आहेत. विद्यार्थ्यांनाही स्पर्धेत यशस्वीपणे उतरविले आहे.

शाळेतील सहकारी शिक्षकांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना स्वरचित कविता अर्पण केली आहे. लेखन, वाचन, वक्तृत्व यांची विशेष आवड आहे

बराच काव्य समूहांमध्ये सहभाग घेऊन त्यातील काव्य स्पर्धेत यशस्वी

विभागीय शिक्षकांच्या वक्तृत्व व एकपात्री अभिनय स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन यशस्वी

वाचन व लेखनाची विशेष आवड आहे

विविध उपक्रम राबवायला आवडतात

यूटयूबवर विद्यार्थ्यांच्या सहाय्याने केलेल्या कविता प्रकाशित

पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने वेगळया पद्धतीने वटपौर्णिमा साजरी दूरदर्शनने घेतली दखल झु अवेरनेस प्रोग्रॅम, प्लॅस्टिक बंदी यावरही उपक्रम केले

रिलायबल सिरीज पाचवीचे गणित पुस्तक लिहिले

इंटरनॅशनल ह्युमन राइट्स तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार

सन्मान मराठीचा पुरस्कार


सतत तीस तीस वर्षे कार्यरत म्हणून शिक्षण साधना मंडळाकडून सत्कार

महापौर पुरस्काराने सन्मानित

स्वरुप अनाजी सावंत

पत्ता A/1203 ' साईतीर्थ टॉवर, सिद्धार्थ नगर

कोपरी, ठाणे (पूर्व )400603



**विशेष आभार**

**माझे पति -**श्रीयुत अनाजी विठोबा सावंत

**मुले-** विराज, दिव्या

सुन -सायली

**भावोजी** श्रीयुत प्रकाश नाना दळवी

**सूचक श्री** येवतीकर सर

**अर्पणपत्रिका**

माझे हे आगळेवेगळे अनुभवातून सादर ई पुस्तक माझे वडील कै. श्रीयुत ज्ञानदेव लाडू सावंत आई कै. सौ. दीपा ज्ञानदेव सावंत. सासु सासरे कै. श्री. विठोबा अनाजी सावंत व कै. श्रीमती वासंती विठोबा सावंत यांना समर्पित करत आहे. त्यांचे आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी राहू देत.

# मनोगत – स्वरूप सावंत

नेहमीच्या चाकोरीच्या विषयातून बाहेर आणणारे ई-साहित्य प्रकाशनचे सुनील सामंत. त्यांचे विशेष आभार. मला असा विषय सुचविला की मी माझे मी आत्मपरिक्षण केले. विधात्याने दिलेल्या माझ्या या कर्तव्यात मी परिपूर्ण उतरले का? त्या निमित्ताने विखुरलेल्या पाखरांना शोधले. अजूनही त्यांना मी आठवते. सुशांत ने वॅाटस ॲप ग्रुप बनवला. विधायक उपक्रम करायचे ठरले. वनिता नेही खूप मदत केली. १५ जणांचा माजी विद्यार्थांचा ग्रुप बनला. खूप बरे वाटले.

एक वेगळी दिशा दिल्याबद्दल ई -साहित्य संयोजकांचे खूप खूप आभार.

tv9 पासून राजकारण, शिक्षक, इंजिनिअर, सरकारी अधिकारी अशा विविध क्षेत्रात विद्यार्थी आहेत. ते पाहून समाधान वाटले. कार्यपरिपूर्तिचा आनंद झाला. 🙏🙏💐💐

सौ. स्वरूप सावंत

# विद्यार्थिर्नी चे मनोगत

नमस्कार माझ्या वर्ग-मित्र मैत्रिणींनो,

मी सौ. वनिता पिसाळ-देवकाते, साधना विद्यालय सायन,

माजी विद्यार्थिनी,

तुम्ही म्हणाल आज हिला काय झाले, एवढी औपचारिकता का करत आहे? पण कारणही तसेच आहे. आज आषाढी एकादशी, पवित्र दिवस विठू आपला गुरु,

गुरु विठ्ठल, गुरुदेवता विठ्ठल।
निदान विठ्ठल, निरंतर विठ्ठल।।

त्याला पाहून मला आपल्या शाळेच्या गुरुजनांची आठवण झाली. आणि कुठेतरी वाचलेल्या हिंदी कवितेच्या ओळीं सहज आठवल्या.

कडी धूप जो दे वृक्ष कि छाया
ऐसी है इनकी ज्ञान कि माया,
नही होता कोई रक्त संबंध,
फिर भी है जीवन का अनमोल बंधन।

तशी आठवण होण्याचे आणखी एक कारण म्हणजे आपल्या आवडत्या सौ. स्वरूप सावंत बाई. नुकतीच माझी आणि त्यांची फेसबुक वर ओळख झाली, पण त्यांच्याशी बोलताना जणू काही जन्मोजन्मीचे ऋणानुबंध असल्याचे जाणवले.

त्यांच्या स्वभावातील बरेच पैलू ठाऊक नाहीत, पण आज त्या यशस्वी शिक्षिका आहेत आणि एक यशस्वी आई हि भूमिकाही त्या आनंदाने बजावत आहेत. आपल्या शाळेतील विद्यार्थी यशस्वी होत आहेत हे कळल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे. बाई वेळोवेळी वर्ग-मित्र मैत्रिणींची चौकशी करत आहेत. परवा माझे त्यांच्याशी बोलणे झाले दहावीच्या विदयार्थ्यांना कसे मार्गदर्शन करावे याविषयी, कारण यावर्षी दहावीच्या पाल्याचे पालकत्व, हे इंद्रधनुष्य मला पेलायचे आहे. त्यांच्याशी बोलल्यानंतर पालक म्हणून माझा दृष्टिकोन तर प्रगल्भ झालाच पण मनावरील एक दडपण होते ते ही नाहीसे झाले. आमची प्रगती करणाऱ्या तसेच आमच्यात आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या गुरुजनांचे आम्ही सदैव ऋणी आहोत, धन्यवाद सावंत बाई.

भीड में एक गुरु ही अपना,
दिखाए जो जीवन का सपना,
पग-पग पर देते वो दिशा निर्देश,
गुरु से ही सजे जीवन परिवेश।

आचार्यात् पादमादत्ते पादं शिष्यः स्वमेधया ।

पादं सब्रह्मचारिभ्यः पादं कालक्रमेण च ॥

( विद्यार्थी अपना एक-चौथाई ज्ञान अपने गुरु से प्राप्त करता है, एक चौथाई अपनी बुद्धि से प्राप्त करता है, एक-चौथाई अपने सहपाठियों से और एक-चौथाई समय के साथ (कालक्रम से, अनुभव से) प्राप्त करता है।

# माझे प्रिय विद्यार्थी

या पुस्तकातील सर्व कथा, अनुभव सच्चे आहेत. मात्र त्यातील नांवे काल्पनिक आहेत. कारण आज ते विद्यार्थी ज्या स्थांनांवर आहेत तिथे त्यांना हा उल्लेख आवडेल वा न आवडेल.

या पुस्तकाच्या निमिताने आम्ही सर्व शिक्षकांना आपल्या आयुष्यातील विशेष विद्यार्थ्यांबद्दल चार शब्द लिहीण्याचे आवाहन करतो. योग्य त्या अनुभवांना पुस्तकरुपाने प्रसिद्ध केले जाईल.

पत्रव्यवहारासाठी लिहा

esahity@gmail.com

संपादक

ई साहित्य प्रतिष्ठान

# १) कमलेश

शिक्षक म्हटले की शेजारी नातेवाईक मित्र मंडळी एका वेगळ्या अपेक्षेने पाहतात.

आम्ही मुंबई सेंट्रल येथे राहात होतो

आमच्या शेजारी एक जैन कुटुंब रहात होते अजूनही तेथेच राहतात.

त्यांचा मुलगा कमलेश त्यावेळी ८वी इंग्रजी माध्यमात शिकत होता. तो अजिबात अभ्यास करत नसे. परिक्षेवेळी बेंच वाजवायचा शिक्षक त्याला वर्गाबाहेर काढत. परिणामी एक इयत्ता दोन वर्षांनी पास होत असे. पालक खूप त्रासले होते. त्याची आई माझ्या खूप मागे लागायची. मी मराठी माध्यमाची. शिक्षण मराठीत. म्हणून मी तयार नव्हते. पण पालकांनी गयावया केल्यावर मी तयार झाले. पण पैसे नको सांगितले. कारण मी कितपत त्याचा अभ्यास घेऊ शकेन याबद्दल मी साशंक होते.

तसा आठवीत म्हटले तरी वयाने मोठा होता. अभ्यास येत नव्हता. बैठकीची सवय नाही. पण शांत होता. ऐकायचा.

आठवीची मराठी माध्यमाची पुस्तके आणली. दोन्ही माध्यमाची पुस्तके समोर ठेवून शिकवायला सुरुवात केली.

त्याला देवाच्या पाया पडण्यापासून, अभ्यासाची बैठक, मूळ पायापासून शिकवले. सराव पेपर घेतले. मराठी पेपरमध्ये तर तो चार ओळीदेखिल लिहित नसे. मराठी निबंध धडे प्रथम चर्चा करून समजावत होते. गणित सूत्र संकल्पना स्पष्ट केल्या. त्याला समजेपर्यंत शिकवले. अगदी रात्री ११ पर्यंत बसत असे. हळूहळू त्याला अभ्यासाची आवड निर्माण झाली. तो मला चांगला प्रतिसाद देउ लागला. जो पर्यंत मी ऊठ म्हणत नाही तोपर्यंत ऊठत नसे. फक्त एकच अडचण होती. ते जैन कांदा लसूण ही खात नव्हते. आणि आम्ही कोकणी. वाराला मासे चिकन असायचे. त्याला त्या वासाचा त्रास व्हायचा. मग आम्ही जेवण उशीरा बनवत असू. तेव्हढा वेळ तो घरी बसून होमवर्क करीत असे.

सहामाही परिक्षा जवळ आली. बेंच न वाजवता तो सर्व पेपर सोडवून आला. त्याच्या चेहऱ्यावर आनंद असे.

एकवीस दिवसांच्या सुट्टीनंतर शाळा सुरु झाली. आता पेपर मिळतील या आशेने आम्ही वाट पहात होतो. मला जास्त उत्कंठा होती.

नेहमीप्रमाणे तो शाळेत गेला. त्याच्या आईपेक्षाही मी त्याची वाट पहात होते. पण तो घरी आलाच नाही. त्याची आई म्हणाली आता जर तो नापास असेल तर तो कदाचित घर सोडून जाईल असे मला वाटते. मी खूप घाबरले. एक क्षण उगाच मी ह्या फंदात पडले असे वाटले. आम्ही शाळेजवळ गेलो. तेथे कुणीच नव्हते. तेव्हा मोबाईल नव्हते. घरी आलो एक दोन मित्रांना फोन लावले. पण त्यांनी माहित नसल्याचे सांगितले.

माझे मिस्टर अनाजी आणि त्याचे बाबा जाऊन पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार नोंदवून आले.

रात्री उशीरा पोलीस त्याला घेऊन आले. चोरांनी पैशासाठी त्याला मारले होते. दप्तर फाटले होते. त्याला कुणीच काहीच बोलले नाही. सकाळी अंघोळ केल्यावर त्याला आम्ही विचारले.

त्याने जे सांगितले ते ऐकून आम्ही थक्क झालो. तो सर्व विषयात चांगला पास झाला होता. परंतू त्या शाळेतील शिक्षकांनी तू हे लिहूच शकत नाही तू कॉपी केलीस का अशी जबरदस्ती केली. त्याचे न ऐकता त्याचे सगळया पेपरमधील गुण कमी केले. नापास दाखवले. त्यामुळे तो बिथरला. व घर सोडून गेला.

माझे मिस्टर त्याला घेवून शाळेत गेले. मुख्याध्यापकांना भेटले मी त्याच्यासाठी घेतलेले कष्ट सांगितले.

समोर प्रश्न टाकायला लावले त्याने उत्तर लिहून दाखवले मध्ये एकवीस दिवसांची सुट्टीनंतरही काही फरक नव्हता.

शिक्षकांनी मान्य केले. मग त्याची शिक्षणाची गाडी जी धावली ती bsc पर्यंत.

आता कमलेश बंगलोरला चांगल्या कंपनीत नोकरीला आहे. लग्न झालेय. मुलगी आहे. त्याच्या पुढील आयुष्यासाठी माझे सदैव आशिर्वाद

# २) दिपक

शाळेत ३२ वर्षे नोकरी झाली बरीच वर्षे जवळ जवळ १२ ते १५ वर्षे मी शिष्यवृत्तीचा क्लास घेतला. आमची शाळा सायनला असली तरी विद्यार्थी धारावी कुर्ला ॲन्टॉप हिल मधून येतात. पालकांना शिकविता येत नाही

काहीच पालक शिकवू शकतात. त्यामुळे त्यांचे सर्वेसर्वा आम्हीच. शिष्यवृत्तीच्या मेरीटमध्ये थोडी मुले आली तरी ९५% पास होत. काही मुलांची तर खाण्याची पण आबाळ असे.

बाहेरून वेगळी पुस्तके घेण्यापेक्षा मी प्रत्येक घटकाचे १०० गुणाचे पेपर काढत असे. सर्व विषय अंतर्भूत केल्यावर तर पाठातील बारीक बारीक प्रश्न काढले

वर्गात जास्तीत जास्त वेळ मुख्यांच्या परवानगीने शिष्यवृत्तीचाच अभ्यास चाले.

पूर्ण १ वर्ग परिक्षेला बसवायचा. त्यात हुशार मुले हेरायची त्यांचा वेगळा अभ्यास घ्यायचा सर्व मुले पास होण्याचा सराव घ्यायचा. पण त्यात चॅलेंज असायचे.

२००९ साली माझ्याकडे जी बॅच आली त्यात ५ मुले मेरीटमध्ये येण्यासारखी होती. माझे त्या मुलांकडे विशेष लक्ष होते. त्यांच्या जोड्या केल्या त्यातील अवंतिकाच्या सख्ख्या काकाचे लग्न आले पालकांना समजावले दोघांनाही

समजले अवंतिने आधी डबल अभ्यास केला व अभ्यास करण्यासाठी पुस्तके घेऊन गेली. मी पालकांना खर्च नको म्हणून खूप सरावाची पुस्तके साठवून ठेवली होती. सोडवून झाली की परत घ्यायची.

दिपक आणी संयम दोघांची जोडी केली होती. वर्गात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा दोघांनी एकमेकांना तोंडी प्रश्न विचारायचे. शाळा सुटताना मला सांगायचे. त्यांचा रोज रेकॉर्ड वाढायचा. त्यांचा आत्मविश्वास वाढत होता. घरीही त्यांच्याकडून पालक करून घेत असत. दिवसा कधीकधी ३०० प्रश्न ही होत असत. दिलेला वर्गातील अभ्यास लवकर उरकायचा अन् प्रश्न विचारायचे

म्हणता म्हणता परीक्षा झाली. मी मुलांना पर्याय लिहिला की प्रश्नपत्रिकेवर पेनाने टिंब करून ठेवावयास सांगायचे त्यामुळे त्यांनी नक्की कोणते उत्तर लिहिले किती गुण मिळू शकतात किती पास किती मेरीट मध्ये येऊ शकतात त्याचा अंदाज येई. झाले ५ पैकी ३ तर फिक्स होते. दिपक संयम आणि अवंतिका

जूनमध्ये सुट्टी असताना निकाल आला. दिपक चक्क नापास. सगळयांनाच धक्का. तो स्वामीभक्त आहे. तो म्हणाला मी आता स्वामींच्या पाया नाही पडणार. पालकही खूप नाराज झाले. बसवले नसते परिक्षेला तर बरे झाले असते असे बोलु लागले.

मी त्यांची समजूत काढली. आत्तापर्यंत कधीच रिचेकिंग चे फॉर्म भरले नव्हते. प्रोसिजर माहीत नव्हती. माझ्या बहीणीने शिल्पाने पटकन माहीती काढून दिली. पण ते पालक रिचेकींगने काही होणार नाही पैसे ही फुकट जातील असे म्हणत

होते. त्यांना मी सांगितले मी हवे तर पैसे भरते अगदी वेळ पडली तर पुण्याला ही येईन. कारण त्या मुलावर मला अन्याय होऊ द्यायचा नव्हता. मला गॅरंटी होती की रिझल्ट चुकीचा आहे.

पालकांना सांगितले. आपण काहीच केले नाही तर कदाचित काही दिवसांनी असे वाटेल की अरेरे प्रयत्न केला असता तर बरे झाले असते.

बहीण शिल्पा हिने बरीच माहिती दिली. विभागातील अधिकारी शोधले त्यांच्या शाळेत गेले ते भेटले नाहीत. फोन नंबर मिळवला आणि मग त्यांना सतत फोन केले. त्यांनीही न रागावता खूप मदत केली. तिथून कागद पुढे जायला वेळ झाला तर म्हणून दिपकच्या बाबांना पुण्याला जाऊन हाती देऊन येण्यास सांगितले. ते ही गेले.

साधारण महिन्याने निकाल आला दिपक फक्त पासच नाही तर मेरीट मध्ये आला होता. मिशन संपले.

आत्मविश्वास सच्चाई अथक परिश्रम चिकाटी सर्वांचा विजय झाला. दिपकला स्वामी पावले. त्याचा त्यांच्यावरील श्रद्धेचा विजय झाला

## ३) प्रितम

आमची शाळा आता बालवाडी ते दहावीपर्यंत मराठी माध्यम वइंग्रजी माध्यम आहे. दोन थोड्या मोठ्या इमारती. एक बैठी छोटी शाळा .दुसऱ्या इमारतीतच सेंट्रल बँक आहे. तिथे आमचा पगार होतो.

एके दिवशी मी आणि माझे मिस्टर अनाजी सावंत बॅंकेत गेलो होतो. बॅंकेतून बाहेर आलो आमच्या गप्पा चालू होत्या तितक्यात पलिकडून एक मुलगा धावत आला व माझ्या पाया पडला.

अरे तू कोण असे विचारले असता मागोमाग त्याचे वडील ही धावत आले नमस्ते बाई ओळखले का? मला आठवेना त्याच्या बाबांना पाहून ते पालक आहेत हे ओळखले. पण तो अगदी उंचापुरा मुलगा मी पहातच राहीले "प्रितम माने आहे हा बाई. आम्ही पलीकडे होतो. तुम्हाला पाहिले अन् ह्याला म्हटले त्या बघ सावंत बाई. धावतच सुटला तुम्हाला भेटायला"

"प्रितम खरेच ऊंच किती झालास मी ओळखलेच नाही काय करतोस तू आता किती शिकलास बाबा"मी विचारले

"बाई हा इंजिनिअर झाला तुमच्या कृपेने. आशीर्वाद द्या त्याला "असे म्हणत बाबांच्या डोळयात पाणी आले. तो माझ्या पाया पडला अन् अगदी खाली मान घालून उभा राहिला.

"अरे आहेत न आशिर्वाद. काही नाही तू अभ्यास केलास म्हणून तू शिकलास "

बाबा म्हणाले" नाही बाई तुमच्यामुळेच आम्ही दोघेही तुमची खूप आठवण काढतो." दोघांनी नमस्कार केला व निघाले.

मिस्टर म्हणाले "असे का ते बोलले". मला एकदम दुसरीतला प्रितम आठवला वर्गात तो जवळ जवळ झोपेतच यायचा. अभ्यासाकडे लक्ष नाही. वहया नाहीत. मी त्याच्या आईला भेटायला बोलावले. आईच्या बोलण्यात बोलणे नव्हते. मला राग आला. मी बाबांना बोलावणे पाठवले. त्यांनी आता काळजी घेतो म्हणून सागितले. पण परत परिस्थिती तशीच. पुन्हा बाबांना बोलवले. त्याला रात्री लवकर झोपवत का नाही? कसा येणार ह्याला अभ्यास?

तेव्हा बाबा हात जोडून म्हणाले त्याच्या आईला लिहिता वाचता येत नाही. त्यांना बहुदा नाईट ड्युटीवर जायला लागायचे. घरात टीव्ही नाही. त्यांच्या छोट्या घराला जोडूनच समोरचे घर होते त्यांचाच टीव्ही रात्रभर चालू असे. यांच्या घरात कुठेही बसले तरी तो टीव्ही दिसत असे आणि आवाजही येतसे. त्यामुळे ते मुलाला बंदी करू शकत नव्हते. ते सांगताना त्यांच्या डोळयात पाणी तरळले. मुलाला शिकविण्याची इच्छा बाकी त्यांची प्रबळ होती.

मी म्हटले ठीक आहे. मुले बारा वाजता सुटत व आम्ही एक दहाला. मुख्याध्यापिका भागवत बाई यांची मी परवानगी घेतली आणि बारा ते एक दहा माझे इतर काम करत त्याला जवळ बसवून मी शिकवू लागले. शब्द वाचन, वाक्य

वाचन अंक ओळख छोटी छोटी उदाहरणे पायापासून त्याचा अभ्यास सुरू झाला. रोज बाबांनीच न्यायला यायचे असे ठरवले. बाबा आले की त्या दिवशी मी काय घेतले हे त्यांना सांगायचे. घरी गेल्या गेल्या परत त्याची उजळणी घ्यायला सांगायची.

असे दोन तीन महिने गेल्यावर लिखाण वाचन थोडे थोडे जमायला लागले. आपल्याला येते म्हटल्यावर त्याची अभ्यासाची गोडी हळूहळू वाढू लागली. वर्गातील त्यांचे झोपणे कमी होवू लागले. गणितात तो मास्टर झाला. गणित हा विषय त्याला तिथेच आवडू लागला होता. गणिताच्या मूळ संकल्पना त्याला स्पष्ट करून दिल्या. घरचा सरावही त्याचा वाढला होता. परिस्थिती नसताना बाबांनीही त्याच्या उचल घेतली होती.

मुळात माझा आवडता विषय गणित असल्याने मी वर्गात गणित जास्त शिकवते. हळूहळू त्याची गाडीही मार्गाला लागली पुढल्या वर्षी त्याला दुसऱ्या बाई आल्या. त्याचे बाबा म्हणाले बाई आता ही त्याची शिकवणी चालू ठेवा. पण मी त्याला नकार दिला त्यांना सांगितले आता तुम्हाला त्याला अभ्यास कसा करायचा हे समजले आहे. तेव्हा माझी गरज नाही. अगदीच अडले समजले नाही तर माझ्याकडे तुम्ही येऊ शकता. पण आता त्याचे त्याला करू द्या.

अभ्यासातील नियमितपणा कसा ठेवावा हे त्याला वर्षात पक्के समजले होते. त्यामुळे त्यालाही माझ्याकडे पुन्हा यावे लागले नाही. चौथीनंतर आमचा विभाग बदलतो मुले माध्यमिक ला जातात शाळा दुपारची होते समारंभाच्या दिवशी

भेटला. तो अबोल व लाजाळू असल्याने नंतर मला दिसला नव्हता. आमचे कामच असे असते- करायचे आणि बाजूला व्हायचे. मी रमले नंतरच्या आलेल्या बॅचमध्ये.

प्रीतम भेटला आणि परत त्या आठवणी उजळल्या. प्राथमिक विभाग यासाठीच असतो. मुलांना श्रवणाची अभ्यासाची गोडी लावणे, त्यांना अभिव्यक्त होण्याची संधी देणे, स्व अभ्यासाची सवय लावणे. त्याचा परिणाम चांगला होतो आहे हे मला दिसून आले आणि मनोमन खूप आनंद झाला. हा पेशा मी स्वीकारला त्याबद्दल अभिमान निर्माण झाला. आम्ही दोघेही घराच्या दिशेने निघालो. परंतु प्रीतम च्या आठवणी सारख्या मनात येत होत्या. एक वेगळाच आनंद आणि समाधान यांची अनुभूती मी घेत होते. शिक्षक असल्याचा सार्थ अभिमान।

# ४) परी

एके दिवशी संध्याकाळी आम्ही दोघे व मुले विराज दिव्या तलावपाळीला फिरायला गेलो होतो. अन् अहोंच्या मित्राचा फोन आला. त्यांना सर्वजण नाना बोलतात. "अरे नाना काय करू? खूप टेंशन आहे "

हे म्हणाले "का, काय झाले. "

“अरे मुलगी दहावीला आहे परिक्षेला तीनच महिने राहिले काय करू कळत नाही अभ्यास कर म्हटले तर छताकडे पहात राहते. पुस्तक असते हातात. पण लक्ष नसते! कसे होईल तिचे कळत नाही.

मग आमचे हे म्हणाले काळजी कशाला करतोस "माझी मिसेस पाहिल तिला घेऊन ये घरी." ते इतके टेंशनमध्ये होते की आता येऊ का विचारले ह्यांनी लगेच होकार दिला. मुले थोडी हिरमुसली. आम्ही घरी पोहोचतो न पोहोचतो तोच ते कुटुब घरी येवून पोहोचले.

मी सर्वप्रथम परीला घेऊन वेगळया रूम मध्ये गेले. तिला सर्वप्रथम सांगितले की तुझ्याशी जे बोलेन ते तुझ्या मम्मी पप्पांना सांगणार नाही. अन् त्यांच्याशी जे बोलेन ते तुला सांगणार नाही. फक्त खरे बोलायचे. मी सांगेन तसेच वागायचे. चालेल का? तीनच महिने हातात होते. तिने कबुली दिली. मग तिची दिनचर्या विचारली त्यात क्लास शाळा जाण्या येण्याचा वेळ या सर्वांमुळे वेळ मिळत

नव्हता. त्यांना मी क्लास थांबवायला सांगितले. तिचे आवडीचे विषय कठीण विषयांचा अभ्यास कसा व कोणत्या वेळी करायचा त्याचे वेळापत्रक बनवून दिले.

मग वळले पालकांकडे. त्यांच्याबद्दल तिच्या काही तक्रारी होत्या. त्या सगळया टेंशनमुळे होत्या. त्यांना तिच्या रिविजनच्या वेळा त्याचा चार्ट मम्मीने कसा करायचा. सूत्र आकृत्या यांचा चार्ट कसा बनवायचा तो पालकांनी कारण वेळ कमी होता. आहारासंबधी ही चर्चा केली. दोघांनी तिला मानसिकता बदलायला कशी मदत करायची, तिचे मूड काही दिवस कसे जपायचे ते सांगितले. तिघांचाही आत्मविश्वास वाढवला. वेळ हातात आहे हे समजल्याने ते निश्चिंत होऊन गेले. मी व माझ्या मिस्टरांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी केले. ती रोज फोन करत असे. येणाऱ्या अडचणी सांगत असे. मी त्यातून मार्ग काढत असे.

परीक्षा जवळ आली. बऱ्यापैकी अभ्यास होत होता. पालकांनीही रागावर ताबा मिळवला. त्यांना एकच सांगितले परिक्षेवरून आल्यावर पेपर कसा गेला विचारायचे नाही. पूर्ण परिक्षा झाल्यावरही. पुढच्या पेपरचाच विचार करायचा. एकेका गुणांची खिंड लढवायची.

म्हणता म्हणता परीक्षा सुरु झाली. रोज रात्री मला ती फोन करत असे. मी तिला कधी उठायचे. कसे घटक सराव करायचे ते सांगायचे. बस्स इतकेच.

झालेल्या पेपरबद्दल काहीच विचारत नव्हते. ती ही सांगत नव्हती. परीक्षा संपल्यावर तिच्या पालकांना पुढचे काय ते ठरवायला सांगितले. तिला

लहानपणापासून इलेक्ट्रॉनिक्सची आवड असल्याने जर गुण मिळाले तर इन्स्ट्रमेंट मध्ये डिप्लोमा करायची इच्छा होती.

जून उजाडला. त्यांचे टेंशन कमी करून माझे वाढवले होते. दुसऱ्या दिवशी शाळेत असताना माझा फोन वाजला. शाळेत चालत नाही. म्हणून मला शक्यतो कुणी फोन करत नाही. मी पटकन फोन उचलला. परीच्या पप्पांचा फोन होता. ते म्हणाले "परीला ७२%गुण मिळाले. मला आत्ता कळले. मी घरीही फोन केला नाही. पहिला हक्क तुझा म्हणून तुला फोन केला. खरेच खूप खूप आभार. मला माहीत आहे शाळेत फोन चालत नाही. पण थांबवले नाही " माझा आनंद ग़गनांत मावेना.

तिने डिप्लोमाला प्रवेश घेतला. परत ती अडकली. त्यांचा परत फोन. मी म्हटले डिप्लोमाचे मला काय कळणार. एखाद्या त्या क्षेत्रातील तज्ञाला भेटा. ते म्हणाले "मी तुझ्याकडेच आणणार. मला माहीत आहे तिचा प्रश्न तुझ्याकडेच सुटेल. " मी म्हटले "ठीक आहे "ती आली. तिच्याशी बोलले. माझा मुलगा विराज डिप्लोमा झाला असल्याने त्याने तिला महत्त्वाचे प्रश्न काढून दिले. बस्स एकदाच. मग तिची गाडी पुढे सरकली ती डिग्रीपर्यंत

आता बोहल्यावर चढायची तयारी सुरू आहे तिची. तिला शुभेच्छा !

# ५) अभय

माझी धाकटी बहीण शिल्पा व मोठी बहिण सुप्रिया आम्ही वर्षातून एक दोन वेळा फक्त तिघीच भेटतो. एक उनाड दिवस साजरा करतो. त्या दिवशी तसेच ठरले मी शिल्पाच्या कार्यालयाकडे जाणार मग आम्ही दोघी दादरला भेटायला जाणार. मी शिवडीला तिच्या कार्यालयाच्या खाली उभी होते तिची वाट पहात.

तेवढ्यात एक साधारण सावळा मुलगा सायकलीवरून आला. कपडे मळकट होते. मला पाहून थबकला. लांब उभा राहून सारखा माझ्याकडे पहात होता. प्रथम मला त्याचा राग येऊ लागला. मग त्याचे रुपांतर भितीत होऊ लागले. मी त्याच्याकडे रागाने पाहिले. तसा तो त्या इमारतीत चढला. प्रत्येक मजल्यावर चढला की मधल्या खिडकीतून मला पहायचा. मी अस्वस्थ होऊ लागले कधी एकदा बहीण येते आणि मी तेथून पळ काढते असे झाले होते.

तितक्यात तो मुलगा इमारती बाहेर आला. मी मनात म्हटले आता ह्याला मारू की ओरडू.

तो जवळ आला व म्हणाला "मॅडम नमस्ते राग येणार नसेल तर एक विचारू".

चला आता याचा सोक्षमोक्ष लावू यासाठी म्हटले ", विचार".

तुम्ही साधना विद्यालयातील सावंत बाई आहात का? माझा राग एकदम खाली उतरला. हो का?

मी मघापासून ओळखायचा प्रयत्न करत होतो. तुमच्यात खूप बदल झालाय खूप वेगळ्या दिसताय. मनात म्हटले हा आपला विद्यार्थी दिसतोय. अन् तसेच झाले.

" बाई मी तुमच्या वर्गात होतो. अभय". मस्ती खूप करायचा. आठवले. बाई तुम्ही स्वप्न दाखवायचा तेव्हा मला ते खरे नव्हते वाटत. मी मस्तीत गुंग होतो. कोणाचेच ऐकले नाही. पुढे गाडी माझी अडकली. मी जास्त शिकलो नाही. आता खाजगी कुरिअर कंपनीत नोकरीला आहे. खूप राबवून घेतात आणि पगार खूप कमी भागत नाही हो तेव्हा तुमची आठवण येते त्यावेळी तुमचे ऐकले असते तर आज ही पाळी माझ्यावर आली नसती. आज तुम्ही दिसलात मला माझी उशीरा कळलेली चूक सांगावीशी वाटली.

ते ऐकून मन सुन्न झाले. मी त्याची समजूत काढली अन् सांगितले "बाळा अजून वेळ निघून गेली नाही. तुला जर खरेच पश्चाताप होत असेल तर अजूनही वेळ आहे. त्याला यशवंतराव चव्हाण विदयापीठाविषयी माहिती सागितली. अजूनही वेळ आहे. तुझे दिवस तू बदलू शकतोस. असे सांगितले. शिल्पा कधीच येऊन उभी राहिली होती. ठीक आहे पाहतो. असे सांगून तो हात जोडून निघून गेला.

तो शिकेल की नाही याबद्दल मी साशंक होते. कारण दिवसभर कष्टाचे काम केल्यावर तो काय शिकणार. असो मी माझे काम केले होते. ज्या कामात यश नाही तर आनंद समाधान नाही न मिळत.

मला एक सवय आहे. मी मुलांना स्वप्न दाखवते. वेळ लावून अभ्यास केला आहे. मला खूप मोठी साहेबाची नोकरी लागली आहे. माझ्याकडे कार आहे. मी इतरांना मदत करू शकतो. सगळे मला साहेब म्हणत आहेत.

हे सगळे हवे असेल तर काय करावे लागेल? तुम्हाला मन लावून अभ्यास करावा लागेल. जास्त नको दिवसात दोन तास मनापासून बसा. एखादा खेळ निवडा. तोच खेळ सतत खेळा. चित्र काढा.

असे मी सतत सांगत असे जेणेकरून त्यातील काही मुले तरी स्वप्न जोपासतील. आपली प्रगती करेल.

# 6) पूजा

आमचे एक स्नेही रवी कर्डिले घरी आले. त्यांची पुतणी सहावीत गेली पण तिला गणित हा विषय खूप कठीण जात असे. तिला भितीच वाटे. काहीही करा पण तिला शिकवा असे सांगू लागले. ठीक आहे. दुसऱ्या दिवसापासून ती माझ्याकडे येऊ लागली.

पाहिले तर मूलभूत क्रिया स्पष्ट नाही. पाढे पाठ नाहीत खूप बिकट अवस्था. माझा प्रयोग सुरू. खरे पाहिले तर असे प्रयोग करायला मला ही आवडत असे. कारण त्या साठी कोणत्याही कागदपत्रांची कुणाच्याही परवानगीची गरज नाही. एका सिनेमातील डायलॉग आहे. अपघात झालेल्या गंभीर माणसाला आधी उपचार की चौकशी गरजेची असते. कारण कागदपत्र पूर्ण होईपर्यंत तो माणूसच हाती लागत नाही.

असो पूजा माझ्याकडे येऊ लागली. पुस्तक बाजूला ठेवून अंक, सूत्र कसे तयार झाले, याप्रमाणे सर्व प्रथम संकल्पना स्पष्टीकरण सुरू केले. अंक पाढे परिमाणे यांवरील सराव सुरू. सुरूवातीला ती खूप घाबरायची. पाढे म्हणताना खूप अडखळायची. थांबा बाई म्हणते. असे म्हणत खूप अडखळत पाढे म्हणून दाखवायची. मला ते स्वीकारावे लागायचे.

पूर्वी पावकी, दिडकी, अडिचकी, पाढे करुन घेतले जायचे. घरेच ती पध्दत खूप चांगली होती असे मला वाटते. पांठांतर पद्धती चांगली पण न समजता केलेली चुकीची १ते १०० अंक क्रमाने म्हणता येतात. पण अधला मधला अंक ओळखता येणे जरूरीचे असते. पाठांतर घोकंपट्टी यातील फरक समजला पाहिजे. गणिती सूत्र सांगितली जातात उदा. पायथागोरस चे सूत्र डायरेक्ट सांगण्यापेक्षा ते कसे तयार झाले ते आकृती काढून समजावणे गरजेचे असते असे मला वाटते. आधी त्या पद्धतीनेच सोडवणे गरजेचे असते. मग ती संकल्पना फ़िक्स होते.

गणितीय प्रत्येक सूत्रामागे एक तत्व असते. ते कसे बनले ते समजले की संकल्पना स्पष्ट होते. मग त्यावरील उदाहरणे ही सोपी होतात.

त्याप्रमाणे पहिला पाया पक्का झाला की एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होतो. गणितापासून पळणारी मुले तिच्या मागे धावतात. त्याचप्रकारे आवड ही निर्माण होते. त्याचप्रकारे तिचे मी घेत गेले. पाढे पाठ होणे तिला खूप कठीण गेले. पण एकदाचे पाठ झाले. तिला हळूहळू गणितात रस वाटू लागला. ती चांगल्या गुणांनी पास झाली अन् आमचा प्रयोग यशस्वी झाला. शिकवण बंद. गाडी चालू जोरात.

तिने चक्क एम्. कॉम. केले. आता एम्. एन्. सी कंपनीत नोकरीला आहे. छोटे बाळही आहे. तिला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा !

## ७) शुभदा

माझी मैत्रीण पै. तिची मुलगी शुभदा सुरुवातीपासून खूप हुशार होती. ती दहावीत गेली. मी सवयीप्रमाणे तिलाही सांगितले. काही गरज लागल्यास सांग.

कारण मलाही ती सवयच लागलीय. मला खूप काही येतेय किंवा मी याचा कोणताही वेगळा कोर्स अथवा मानसशास्त्राचा पुस्तकी अभ्यास केला नाही. माझे अनुभव हेच माझे गुरु. कुणाचे तरी चांगलेच व्हावे ही तीव्र इच्छा. त्यामुळे बऱ्याच वेळा मी लोकांना सांगते मदत हवी का? त्याचे पैसे नसल्याने किंमत वाटत नाही. असो पण जे विचारतात त्यांना बाकी मी नक्कीच मदत करते. कारण मला माहीत आहे की माझ्या असे करण्याने माझ्या वेळेला मलाही कोणीतरी मदत करणार. पिकते तिथे विकत नसते. माझ्या दोन्ही मुलांच्या दहावी बारावी च्या वेळी माझ्या मुलांना मदत करायला माझ्या भाच्या श्वेता आणि तृप्ती धावून आल्या. असो काही वेळेला हुशार मुलांनाही डिप्रेशन येऊ शकते. ती हुशार होती. पण अचानक त्यांनाही अनामिक भिती घेरते अथवा जास्त आत्मविश्वास हि घातक ठरतो.

तिला गणित या विषयाची भिती झाली होती. तसेच उत्तर वेळेला आठवत नाही. ह्या तिच्या अडचणीवर तिच्या भाषेत समजावयाचे ठरवले.

तिला प्रथम गणित विषयाचे वेळापत्रक बनवून दिले. भूमिती ची प्रमेये कशी सोडवायची अन् लक्षात ठेवायची त्याची आयडीया दिली.

पेपरच्या वेळी आठवत नाही यावर एक उपाय सांगितला.

आपला मेंदू म्हणजे एक प्रकारचे संगणक च आहे. म्हणून पेपर हाती आला की सगळे प्रश्न प्रथम वाचायचे. संगणकात गुगलमध्ये प्रवेश. पण कधी कधी लगेच उत्तर स्क्रिनवर येत नाही. घाबरायचे नाही जी उत्तरे मनाच्या स्क्रिनवर आली आहेत ती पटपट पेपरवर डाऊनलोड करायची. तो पर्यंत गुगल उरलेली उत्तरे शोधत असतो. म्हणून ती काळजी करायची नाही. काळजी केली की मनाचा संगणक शट डाऊन होतो. ते होऊ देऊ नकोस.

माझी हि संकल्पना तिला खूप आवडली. हलके वाटले. कारण तिचा संगणक तसा फुल होता. पदमा पाची (मावशी) तू वेगळ्याच प्रकारे समजावलेस. मला हे कंम्पूटरचे उदाहरण खूपच आवडले.

गुड्डू (तिचे टोपण नाव) या दोन्ही संगणकात एक मोठा फरक आहे. तुझ्या लक्षात आला का? ती म्हणाली "कोणता ग" तिचा इंटरेस्ट वाढत होता. अग संगणकाला एम बी जी बी ची मर्यादा असते. परत नेट प्रोब्लेम रेंज हवी. कोणते वर्जन? कितीतरी प्रश्न. पण आपल्या मेंदूच्या संगणकाला sky is the limit. कोणतीच मर्यादा नाही अन् फुकट. फक्त आनंददायी अभ्यासाचा नेट पॅक भरायचा.

पै माऊली अन् शुभदा खूश. मी सांगितलेले लक्षात ठेवले. तिचा आत्मविश्वास वाढला. माझे काम तिथेच संपले.

शुभदा आता डॉ. शुभदा झालीय बीडिएस केलेय. एम डी एस चालू आहे. लग्न झालेय. तिला पुढील यशासाठी शुभच्छा !!

# ८) गौरी

मी साधना विद्यालयात लागल्यापासून बरीच वर्षे तिसरी चौथी चे वर्ग घ्यायला लागले. अन् त्या वर्षी मला मुख्या. भागवत बाई यांनी पहिली चा वर्ग दिला. प्रथम मला काहीच जाणवले नाही. १३ जून ला शाळा सुरू झाली. छोट्या छोट्या बाळांची पळापळ रडारड पाहून माझी भंबेरी उडली. त्या मुलांना स्वतंःचे नाव ही सांगता येत नव्हते. मुले ओळखताना त्रास व्हायचा. मी खूप घाबरले. कारण कळत नकळत मुलांची जबाबदारीही असते आमच्यावर. मी भागवत मॅडम ना भेटले आणि वर्ग बदलून मागितला. पण त्या गोष्टीस त्यांनी नकार दिला. त्या म्हणाल्या दाखव तुझे कौशल्य. तुझ्याकडे आहे. होईल नीट.

मी परत वर्गात गेले. नव्या विचाराने. एका वेगळया ध्येयाने. थोड्याच दिवसात असे लक्षात आले की माझ्या वर्गात गौरी नावाची मुलगी आहे. ती गतीमंद होती. तिला समजणे खूप कठीण जायचे. लिखाण समज शक्ती खूप कमी होती. त्या वर्गात बरीच मुले अभ्यासात मागे होती. एक कोकरू बाकी चुकून माझ्या वर्गात आलेले रोहीणी जाधव. ती हुशार होती. नाव नीट सांगता आल्याने सुरूवातीचे पाच दिवस ती माझ्याच वर्गात बसली होती. सहशिक्षिका पावसकर मॅम च्या वर्गात ती होती. त्या तिला शोधत माझ्याकडे आल्या तिला घेऊन गेल्या.

ते कोकरू तिला माझी सवय लागल्याने ती त्या वर्गात सारखी रडायची. शेवटी ती माझ्याच वर्गात आली. झाले. एक टोक गौरीचे दुसरे टोक रोहीणी. एकीला देऊ थोडे कमी तर दुसरीला दिलेले घेण्याची क्षमता नाही.

गौरीचे बाबा खुप मेहनती. रोज शाळा सुटल्यावर भेटत. काय शिकवले समजून घेत. त्याप्रमाणे घरी सराव घेत.

त्यावेळी मी एक प्रयोग केला. येणाऱ्या मुलांनी न येणाऱ्या मुलांचा सराव घ्यायचा. गट केले गटाला एक पटपट सोडवणारा लिडर दिला. बेरीज वजाबाकी शब्दवाचन याचा सराव गटातून होत असे. अभ्यास लवकर झालेली मुले इतरांचा अभ्यास घेत गुंतल्याने वर्गात मस्ती होत नसे. त्यांची उजळणी होत असे.

गौरी तिच्या वयाच्या मुलीकडून शिकताना खूश असायची. पण लक्षात रहात नसे. तिच्या बाबांची चिकाटी खूप होती. त्यामुळे मलाही बरे वाटायचे. इतर मुलांना लिखाण काम देऊन मी तिच्या जवळ जाऊन शिकवायचे. तिच्या कलाने, तिला समजेल अशा भाषेत शिकवत होते.

बरेच प्रयत्न केल्यावर ती कशीबशी पास झाली. नंतर ही ती अभ्यास करत असे. पण जेमतेम गुण मिळवून पास होत असे हे ही नसे थोडके. ती नंतर किती शिकली हे समजले नाही. पण माझ्याकडून काही ना काही शिकून पास होऊन गेली हेच समाधान.

काही वेळेला अशा बुद्धिमत्ता असलेल्या मुलांसाठी मर्यादा येतात

पालक त्यांच्यासाठी असलेल्या शाळेत पाठवायला तयार नसतात. ते ती गोष्ट मानीत नाहीत. आपण आपले काम करावे हेच खरे.

## ९) राधिका

अनुभव माणसाचा मोठा गुरु असतो. आम्ही जे डि. एड बी एड मध्ये त्यातील खूपच कमी भागाचा उपयोग होतो. याचे एक कारण म्हणजे आमचा संबध वेगवेगळया व्यक्तिमत्त्वाशी असतो. त्यांच्या आयुष्याशी संबध असतो. म्हणूनच फार काळजी घ्यावी लागते. त्या ईश्वराने काहीतरी विचार करूनच आम्हाला हा वसा दिला असावा.

अकरावी बारावी इंग्रजी जमत नाही म्हणून लोक लहान वयाचा विचार न करता इंग्रजी माध्यमात प्रवेश घेत असत. त्याचा परिणाम मराठी माध्यमाच्या प्रवेशावर होऊ लागला होता.

मुलांचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर मायबोलीतून शिक्षण होणे गरजेचे असते. मनोभावना याच काळात विकसित होते. जे करू शकतात ते पुढे जातात त्यासाठी घरातील वातावरण पण तसे असावे लागते.

पण काहींच्या घरी ही तसे वातावरण नसते. शिक्षण ही नसते. पण इतर जण घालतात म्हणून आपणही इंग्रजीत घालावे

अन्यथा इंग्रजी बोलता आले तरी चालेल शिक्षण नाममात्र झाले तरी चालेल. काही जण बाकी पस्तावतात. त्यांना शिक्षण हवे असते. हवालदिल होतात. मग वळतात मराठी माध्यमाकडे.

त्यावर्षी माझ्याकडे ३री चा वर्ग होता. जुलै मध्ये राधिका माझ्याकडे आली. मराठी तिला अजिबात येत नव्हते. इंग्रजी हि विशेष येत नव्हते. त्यामानाने ३री चा अभ्यास जास्त विषय ही वाढलेले असतात. अशावेळी मूळाक्षरांपासून शिकवणे खूप कठीण होते.

तिच्या आई बाबांना बोलावले. पुस्तकांचे वाचन होणे गरजेचे होते. आम्ही कार्यक्रम आखला. आई ने ही मदत करणे कबूल केले. राधिकाला मी वर्गातच वेगळे शिकवायला सुरुवात केली. इतर मुलांना लिखाण दिले की तिला जवळ बोलावून बाराखडी घ्यायची. सुरुवातीला हाताला धरून लिहून घ्यावे लागायचे. मी जे घ्यायची तेच तिची आई घरी पक्के करून घ्यायची. त्यासाठी त्या रोज शाळा सुटल्यावर भेटायच्या. श्रवण, कृती, सराव असे टप्पे घेतले. सुरुवातीला इंग्रजी मराठी मिश्रण असे. मग संकल्पना अक्षरे दृढ होत गेल्या

साधारण तीन महिन्यांनी मराठी ठीक झाले.

पण त्यावेळी तीन महिन्यांनी परीक्षा होत. तिला आताशी पहिलीचा अभ्यास येऊ लागला होता.

मुख्या. भागवत बाईंशी जाऊन विचारविनिमय केला. त्यांनी सांगितले "तू जो अभ्यास घेतलास त्यावर तिला वेगळा पेपर काढ. परिक्षा म्हणजे तरी काय? शिकविलेले कितपत समजले याचे मूल्यमापनच ना? जे शिकवले ते कुठपर्यंत येतेय याची चाचपणी कर. "मलाही ते पटले वेगळा पेपर काढला. पण मनात निश्चय केला. की पुढच्या परिक्षेला तिला वर्गाबरोबर आणायचे.

लिखाण प्रॅक्टिस घेताना तिसरीच्या पुस्तकातील भाग घेत असे. एका दगडात दोन पक्षी मारले. पुढच्या तीन महिन्यात तिचा अभ्यास वर्गाबरोबर आली. पुढच्या परीक्षा तिने वर्गाबरोबर पेपर सोडवले. खूप हुशार नाही पण पास झाली. अभ्यासाची आवड निर्माण झाली.

पालकांनी येऊन आभार मानले. एका शिक्षकाला यापेक्षा आणि काय हवे.

# १०) येशू

सेमी इंग्रजी, इंग्रजी माध्यमाची मागणी वाढली आणि मराठी माध्यमाची गळती सुरू झाली. मायबोलीतून शिक्षण, त्याचे फायदे याकडे नजरअंदाज होऊ लागला. याचा वेगळा परिणाम शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात आला नोकरी टिकविण्यासाठी, मराठी भाषेचे अस्तित्व राखण्यासाठी म्हणा शिक्षक घरोघरी फिरू लागला. मोफत शिक्षण म्हटले तरी खासगीच्या शिक्षकांना त्यांची फी भरणे आले. कुणी पुर्ण भरत तर कुणी डोनर शोधत. त्यात मुलाला पास करणे. त्या क्षमतेपर्यंत आणणे.

त्या वर्षी माझ्याकडे पहिली चा वर्ग होता. एक छोटीसी मंजूळ आवाजात बोलणारी येशू (टोपण नाव) माझ्या वर्गात आली. एक दिवस हजर चार दिवस रजा. तिला विचारले "का ग, येशू तू शाळेत का येत नाहीस ग " त्यावर ती हळूवार आवाजात म्हणाली मला यायचे असते पण मम्मी पाठवत नाही. ति निरागस चेहरा पाहून मला तिची खूप दया आली

एके दिवशी तर शाळा १२ वाजता सुटली. पण आमची निघायची वेळ १.१०. तरिही तिला न्यायला कुणी आले नाही. मी मावशींना सांगितले. की तिला घरी सोडून या. त्यावेळी मोबाईल नव्हते. मी तिला मावशींकडे सुपूर्द करणार.

तितक्यात तिने माझी साडी घट्ट पकडली. मी नाही म्हणून रडू लागली. शेवटी मीच तिला घरी सोडायचे.

तिला विचारले", तुला घर दाखवता येईल का? "

ती हो म्हणाली ", हो".

मग काय दोघी निघालो. रस्त्यात तिचे बाबा सिगरेट ओढत उभे दिसले. मला पाहताच त्यांनी सिगरेट टाकली. त्याचे घरी भांडण झाले म्हणून चक्क तिला न्यायला कुणीही आले नाही. तिच्या बाबांना मी खूप बडबडले. मुलीची काळजी नाही.

मग तिच्या रजाच खूप. मी सराव पेपर काढायचे. कधी कधी घरी नेऊन द्यायची. सकाळी मी शाळा करून गेले तरी तिची आई झोपलेली असायची. तिच्या पप्पांना शाळेत बोलावून काय प्रॅाब्लेम आहे ते विचारले. तर असे समजले की तिच्या आईला इंग्रजी माध्यमात शिकवायचे होते.

मग दोघांनाही बोलावून खूप समजावले. पण ते तिला मान्य नव्हते. मग काय परीक्षा आली. की तिच्या घरी जायचे. मग ती आली तर आली. वर्ष संपले. रिझल्टची वेळ आली. दोनशे दिवसापैकी फक्त वीस दिवस ती हजर होती.

नियमाप्रमाणे ती दुसरीत जाणार. मनाला पटत नव्हते. तिला काहीच येत नव्हते. मुख्या. म्हणाल्या नियमाबाहेर आपण काहीच करू शकत नाही. मूळ पायाच पक्का झाला नाही तर कसे. मी परत दोघांना बोलावले. खूप चर्चा केली. त्यांना

माझे म्हणणे पटले. त्यांना नेमके कुठे शिकवायचे ते ठरवा. पण मुलीच्या आयुष्याशी खेळ नको. अखेर शेवटी त्यांना माझे पटले. इंग्रजी की मराठी या वादात ती कुठेच शिकणार नाही.

तिच्या बाबांनी तिचे नाव काढले. परत पहिलीत प्रवेश घेतला मराठी माध्यमात. नंतर ती शाळेत नियमित येऊ लागली. ४थी च्या शिष्यवृत्तीच्या परिक्षेत ही ती पास झाली. आता सातवीत आहे. दुपारची शाळा. पण अधूनमधून मला भेटायला. तसेच छानसे स्माईल देते. तेव्हा खूप बरे वाटते. आम्हा शिक्षकांचे तेच तर टॉनिक असते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन  
सुनील सामंत  
ई साहित्य प्रतिष्ठान